जि.प.परभणी

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी मा. लोक प्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील गावांतर्गत मुलभूत सुविधा पुरविणे या योजनेंतर्गत अनुदान वितरणाबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्रामविकास व जलसंधारण विभाग
शासन निर्णय क्र. विकास-२०१७/प्र.क्र.१९४/यो-६
बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१.
दिनांक : ३ ऑक्टोबर २०१७

संदर्भ: १) शासन निर्णय, ग्रा.वि.व.ज.सं.वि.क्र. झेडपीए-२०१५/प्र.क्र-१०/वित्त-९, दि. २५/०३/२०१५
२) शासन निर्णय, ग्रा.वि.व.ज.सं.वि.क्र.विकास- २०१५/प्र.क्र.५२/यो-६,दि.२७/०३/२०१५.
३) शासन निर्णय, ग्रा.वि.व.ज.सं.वि.क्र.विकास- २०१५/प्र.क्र.२७४/यो-६,दि.१६/१२/२०१५
४) शासन परित्रक, वित्त विभाग अर्थसं२०१७/प्र.क्र.९४/अर्थ ३ ,दि.३०/०६/२०१७

शासन निर्णय :-

राज्यातील गावांतर्गत मुलभूत सुविधांच्या कामांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत अनेक लोकप्रतिनिधींकडून प्रस्ताव शासनाकडे प्राप्त होत असतात. त्या अनुषंगाने लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील गावांतर्गत मुलभूत सुविधांच्या कामांसंदर्भात संदर्भाधिन क्र. २ व ३ येथील शासन निर्णय निर्गमित करण्यात आले आहेत.

२. सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी "महाराष्ट्र (द्वितीय पुरवणी) विनियोजन अधिनियम २०१७" यास विधानमंडळाने मंजुरी दिली असून महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी त्यास अधिसंमती दिलेली आहे. आणि ते २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४६ म्हणून महाराष्ट्र राजपत्र असाधारण भाग-८, दि. १० ऑगस्ट २०१७ यामध्ये प्रसिध्द करण्यात आले आहे. त्यास अनुसरुन मा. लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील गावांतर्गत मुलभूत सुविधा पुरविण्यासाठी सन २०१७-१८ या वित्तीय वर्षासाठी रु.२०७.८० कोटी (रुपये दोनशे सात कोटी ऐंशी लक्ष फक्त) एवढा निधी मंजूर करण्यात आलेला आहे. तसेच, नियोजन विभागाच्या अ.शा.पत्र क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र.४३/का.१४११, दि.२० जुलै, २०१७ अन्वये पाथरी जि. परभणी विधानसभा मतदारसंघातील विविध विकास कामांसाठी रू. २.८० कोटी (रूपये दोन कोटी ऐंशी लक्ष फक्त) एवढा निधी मंजूर करण्यात आलेला आहे. या निधीतून सोबतच्या अनुसुचीमध्ये दर्शविलेल्या परभणी जिल्ह्यातील विकास कामांना व त्यासाठी लागणाऱ्या रु. २.८० कोटी (रूपये दोन कोटी ऐंशी लक्ष फक्त) इतक्या रकमेस शासन मंजूरी देण्यात येत आहे. तथापि, संदर्भ क्र. ४ नुसार सन २०१७-१८ मध्ये वित्त विभागाने मंजूर निधीच्या ७० % मर्यादेमध्ये निधी वितरण करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. त्यानुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना उपरोक्त मंजूर निधीच्या ७० % प्रमाणे रु. १.९६ कोटी इतका निधी वितरीत करण्यात येत आहे.सदर रक्कम उपरोक्त कामांकरिता खर्च

करण्यासाठी संबंधित पंचायत समितीच्या गट विकास अधिकाऱ्यांकडे सुपूर्द करावी. तसेच, संदर्भाधिन शासन निर्णयातील तरतूदीनुसार खर्च करण्याची कार्यवाही करावी.

३. या शासन निर्णयान्वये मंजूर केलेल्या सर्व कामांसाठी जिल्हा परिषदेच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार प्रशासकीय व तांत्रिक मंजूरी, निविदा काढणे/स्वीकरणे इत्यादी बाबतची कार्यवाही सक्षम प्राधिकाऱ्याकडून करुन घेण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांची राहील. तसेच सदरील कामे मंजूर अनुदानाच्या मर्यादेतच पूर्ण होतील याची दक्षता घेण्यात यावी. मंजूर अनुदानापेक्षा जास्त खर्चाच्या कामांना प्रशासकीय मान्यता दिल्यास, त्यासाठी कुठल्याही स्वरुपात अतिरीक्त अनुदान उपलब्ध करुन दिले जाणार नाही. तसेच ज्या कामासाठी अनुदान मंजुर झाले आहे त्याच कामावर खर्च करणे बंधनकारक राहील.

४. सदरील कामे हाती घेण्यापूर्वी संबंधित क्षेत्रात जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूका / पोट निवडणूकांसाठी आचारसंहिता अंमलात नाही याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांनी खात्री करावी.

५. सर्व कामांच्या पूर्णत्वाचे दाखले व उपयोगिता प्रमाणपत्र संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांनी महालेखापाल, संबंधित विभागीय आयुक्त व शासनास पाठवावेत.

६. या शासन निर्णयान्वये मंजूर केलेला निधी वित्तीय वर्षा अखेरीस खर्च झाला नाही तर अखर्चित निधी शासन कोषागारात जमा करुन चलनाची प्रत महालेखापाल मुंबई व शासनास पाठविण्यात यावी.

७. वरील बाबींवर होणारा खर्च मागणी क्र. एल-३ मुख्य लेखाशिर्ष-२५१५-इतर ग्राम विकास कार्यक्रम-८००-इतर खर्च (०१) (०८) ग्रामीण भागातील विकास कामासाठी जिल्हा परिषदांना सहायक अनुदान (योजनांतर्गत) दत्तमत (२५१५-१२३८), २७ लहान बांधकामे (वेतनेतर) या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ या चालू वित्तीय वर्षातील तरतूदीतून भागविण्यात यावा व त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

८. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. अनौस-१४२/अर्थ-१७, दिनांक १७.०७.२०१६ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे..

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(वि.गो. चांदेकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य,मुंबई.

२) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
३) मा.मंत्री, ग्रा.वि.यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
४) मा.राज्यमंत्री, ग्रा.वि.यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
५) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, १/२, महाराष्ट्र, मुंबई.
६) महालेखापाल, लेखा व परिक्षा, १/२, महाराष्ट्र, मुंबई.
७) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद परभणी
८) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद परभणी
९) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी
१०) जिल्हा कोषागार अधिकारी, परभणी
११) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१२) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१३) कार्यासन क्र. वित्त-१, वित्त-७, वित्त-८, ग्रामविकास व जलसंधारण विभाग
१४) निवड नस्ती कार्यासन योजना-६.

## अनुसूची

**शासन निर्णय क्र. विकास-२०१७/प्र.क्र.१९४/यो-६ दिनांक : ३ऑक्टोंबर, २०१७ वितरण आदेशासोबतची अनुसुची-२५१५ अंतर्गत परभणी जिल्हयातील कामांची यादी**

| अ.क्र. | कामाचे नावं | रक्कम (रु.लक्ष) |
|---|---|---|
| १ | पान्हेरा ता.परभणी येथे सी.सी.रोड करणे | ५.०० |
| २ | सिंगनापूर ता.परभणी येथे सी.सी.रोड व नाली बांधकाम करणे | १०.०० |
| ३ | सिंगनापूर ता.परभणी येथे गावांतर्गत एल.ई.डी.स्ट्रीट लाईट सोय करणे | १५.०० |
| ४ | धोंडी ता.परभणी येथे सी.सी.रोड करणे | ५.०० |
| ५ | सय्यदमिया पिंपळगाव ता.परभणी येथे सी.सी.रोड करणे | ५.०० |
| ६ | बोरवंड बु.ता.परभणी येथे सी.सी.रोड करणे | १०.०० |
| ७ | झाडगांव ता.परभणी येथे सी.सी.रोड व नाली बांधकाम करणे | १०.०० |
| ८ | पोखर्णी नृ. ता.परभणी येथे वडार गल्ली मधील मरीआई मंदिर येथे सभागृह बांधकाम करणे | ५.०० |
| ९ | भोसा ता.मानवत येथे गावांतर्गत सी.सी.रोड करणे | २०.०० |
| १० | भोसा ता.मानवत येथे भोसा ग्रामपंचायत अंतर्गत इंद्रायणी देवी मंदिर परीसरामध्ये सुशोभिकरण करणे | ६०.०० |
| ११ | रामपुरी बु.ता.मानवत येथे सी.सी.रोड व नाली बांधकाम करणे | ३०.०० |
| १२ | रामपुरी बु.ता.मानवत येथे गावांतर्गत भोईगल्ली येथे सी.सी.रोड करणे | ५.०० |
| १३ | बोंदरवाडी ता.मानवत येथे सी.सी.रोड करणे | ५.०० |
| १४ | सावरगांव ता.मानवत येथे सांस्कृतिक सभागृह बांधकाम करणे | १०.०० |
| १५ | सावरगांव ता.मानवत येथे सी.सी.रोड व नाली बांधकाम करणे | १०.०० |
| १६ | रामपुरी रत्नेश्वर ता.मानवत येथे सी.सी.रोड करणे | १०.०० |
| १७ | मरडसगांव ता.पाथरी येथे सी.सी.रोड करणे | १०.०० |
| १८ | लिंबा ता.पाथरी येथे सी.सी.रोड करणे | १०.०० |
| १९ | गुंज ता.पाथरी येथे सी.सी.रोड करणे | ५.०० |
| २० | मसला तांडा ता.पाथरी येथे सी.सी.रोड करणे | ५.०० |
| २१ | पेठ बाभळगांव ता.पाथरी येथे जैन मंदिर सभागृह बांधकाम करणे | ५.०० |
| २२ | लोहीग्राम ता.सोनपेठ येथे सी.सी.रोड करणे | ५.०० |
| २३ | वडगाव स्टेशन ता.सोनपेठ येथे सी.सी.रोड करणे | १०.०० |
| २४ | शिर्शी बु.ता.सोनपेठ येथे सी.सी.रोड करणे | ५.०० |
| २५ | थडी उक्कडगांव ता.सोनपेठ येथे सी.सी.रोड करणे | १०.०० |
| | एकुण | २८०.०० |